# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com

**फोन नं. ०२०/२६१२६९३९** **फॅक्स नं. ०२०/२६१११११५३**


क्र.उशिसं/शिष्य/परिपत्रक/नमं/गभौशा/२०१६-१७/ दि.११/०७/२०१६

परिपत्रक :-

**विषय : गणित व भौतिकशास्त्र या विषयामध्ये विशेष प्रज्ञावान विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती योजना नविन मंजूरी सन २०१६-२०१७**

संदर्भ : शासन निर्णय शिक्षण, क्रिडा व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच-१४७०/१०७५२/एस. दिनांक : १४.५.१९७१.

१) उच्च माध्यमिक प्रामणपत्र परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०१६ मध्ये गणित व भौतिकशास्त्र विषयामध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकडून विषयांकित शिष्यवृत्ती योजनेकरीता विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. सोबत अर्जाचा नमुना जोडलेला आहे.

२) आपल्या विद्यापीठातील व विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील संलग्नित शासकीय / अशासकीय महाविद्यालयात गणित / भौतिकशास्त्र हा विषय घेऊन प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या प्रज्ञावान विद्यार्थ्यांची माहिती सोबतच्या प्रपत्रात अचूक व परिपूर्ण भरुन पाठविण्यात यावी. गणित / भौतिकशास्त्र शिष्यवृत्तीसाठी संबंधित विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक परीक्षेतील एकूण गुणांची सरासरी (टक्केवारी) ६० टक्के पेक्षा कमी असता कामा नये. प्रथम वर्ष पदवीसाठी गणित व भौतिकशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती विषयनिहाय (गणित/भौतिकशास्त्र) स्वतंत्र देण्यात यावी.

३) या शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना लवकरांत लवकर देता यावा यास्तव सर्व अर्जाचे त्वरित संकलन करुन प्रस्ताव **दिनांक ३०/०९/२०१६ पर्यंत या संचालनालयास विद्यापीठमार्फतच पाठविण्यात यावेत. विहित कालमर्यादेत प्राप्त झालेलेच प्रस्ताव स्विकारण्यात येतील. त्यानंतर आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही.**

४) शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव महाविद्यालयांनी परस्पर या संचालनालयास पाठवू नयेत, अशा स्पष्ट सूचना आपल्या स्तरावर महाविद्यालयांना देण्यात याव्यात. महाविद्यालयाकडून परस्पर प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. परस्पर आलेले अर्ज दप्तरी दाखल केले जातील, असेही महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

(डॉ. वि. रा. मोरे)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत -

१. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई, पुणे, कोल्हापूर, जळगाव, अमरावती, नागपूर, पनवेल, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर विभाग.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

D:\Sandip\Math & Physics\2016-17\Circular 16-17.docx

## गणित व भौतिकशास्त्र विषयांतील प्रज्ञावान विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज

हा अर्ज दिनांक ---/---/------ पुर्वी महाविद्यालयास मिळाला पाहिजे. तदनंतर आल्यास विचार केला जाणार नाही.

१) अर्जदार विद्यार्थ्याचे संपुर्ण नांव :

२) अर्जदार कोणत्या जमातीचा आहे ? :

अ) अनुसूचित जाती

ब) अनुसूचित जमाती

क) विमुक्त जाती

ड) भटक्या जमाती

३) प्रवेश कोणत्या शिक्षणक्रमासाठी व कोणत्या वर्गात घेतला ? :

४) वर्गात प्रवेश घेतल्याची तारीख :

५) मार्च / एप्रिल २०१५ मध्ये दिलेल्या परीक्षेसंबंधी माहिती :

| परीक्षेचे नांव | परीक्षा घेणारे विद्यापीठ / विभागातील शालांत परीक्षा | परीक्षेत मिळालेले गुण कितींपैकी किती | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | गणित | |
| | | भौतिकशास्त्र | |

वरील माहिती संपुर्ण बरोबर आहे. मागणी करताच संबंधित कागदपत्रे हजर करीन. मला अन्य कोणतीही शिष्यवृत्ती मिळत नाही अथवा दुसऱ्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला नाही. बी. एस्सी. अभ्यासक्रमासाठी मी गणित / विज्ञान (फिजिक्स) हा प्रमुख विषय घेणार आहे.

दिनांक : **विद्यार्थ्याची सही**

---

### कार्यालयाने भरावयाची माहिती

१) विद्यार्थ्याने दिलेली माहिती पडताळून पाहिली ती बरोबर आहे.

२) विद्यार्थ्याची गणित / विज्ञान (फिजिक्स) विषयातील आवड व प्रगती ही त्या विषयातील असलेल्या शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यास योग्य आहे.

३) विद्यार्थ्याविषयी विशेष शिफारस. (असल्यास)

### बँक तपशील

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नांव | बँकेचे नांव | बँक खाते क्रमांक | आय.एफ.एस्.सी. कोड | आधार कार्ड क्रमांक | विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

प्राचार्य

# गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना

| अ. क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना** |
| २ | योजने बद्दलचा शासन निर्णय | शिक्षण क्रीडा व समाजकल्याण विभाग, शा.नि. क्र. एससीएच/२२७०/८५६४१-एस, दिनांक २१ जुन, १९७१. |
| ३ | योजनेचा प्रकार/स्वरुप | सदर योजनेसाठी राज्याकरिता गणित विषयासाठी ५० व भौतिकशास्त्र विषयासाठी ५० असे एकूण १०० संच राज्यस्तरावर मंजूर आहे. सदर संचाची विभागणी विद्यापीठनिहाय करण्यात येते. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील गणित व भौतिकशास्त्र विषयात इ. १२ वीत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी ही योजना लागू आहे. |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. विज्ञान शाखेच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले व गणित किंवा भौतिकशास्त्र हा प्रमुख विषय घेणारे विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास्तव पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस इ. १२ वीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण प्राप्त असणे आवश्यक आहे.<br>३. विद्यार्थ्यांचा अर्ज संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना संबंधित महाविद्यालयामार्फत ३० सप्टेंबर पूर्वी पोहोचणे आवश्यक आहे. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. बारावीची परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत.<br>२. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत. |
| ८ | दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप | नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस शा.नि.०५.०२.२००४ प्रमाणे प्रति माह १०० प्रमाणे रक्कम रु. १०००/- तथापि, नुतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रति माह १०० प्रमाणे रक्कम रु. १२००/- (योजनेच्या नवीन मंजूरीची कार्यवाही उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे करण्यात येते व नुतनीकरण महाविद्यालयाशी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत करण्यात येते.) |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | उच्च शिक्षण संचालनालयामार्फत त्यांचे अधिनस्त सर्व महाविद्यालयास/अकृषि विद्यापीठांस माहे जुलै मध्ये परिपत्रकाद्वारे सदर योजनेचा माहिती, अर्ज करण्याची प्रक्रिया/अर्जाचा नमुना पाठविण्यात येतो. विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज ऑफलाईन पध्दतीने आवश्यक सहपत्रांसह विद्यापीठांमार्फत उच्च शिक्षण संचालनालयास ३० सप्टेंबर पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. |
| १० | अंदाजे प्रक्रियेला लागणारा वेळ | अर्ज भरण्याची प्रक्रिया साधारणपणे माहे जुलै मध्ये सुरु होते. सदर अर्जाची विविध स्तरांवरील छाननी होऊन शिष्यवृत्तीची रक्कम माहे फेब्रुवारी - मार्च मध्ये विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेद्वारे महाविद्यालयास/विद्यार्थ्यांस वितरीत होते.<br>(कालावधी : ऑगस्ट ते मार्च – ८ ते ९ महिने) |
| ११ | संपर्क कार्यालयाचे नाव व पत्ता | उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, ससून सर्वोपचार रुग्णालयाजवळ, पुणे स्टेशन, पुणे -४११ ००१. |